# निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय
# कॉसमॉस को–ऑप. बँक लि.

कॉसमॉस टॉवर, पहिला मजला, प्लॉट नं. ६, आय. सी. एस. कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड,गणेशखिंड, पुणे–४११ ००७.
फोन: क्र. ०२० – ६७०८५३३७/३८ ई मेल : cosmoselectionro2024@cosmosbank.in

## सर्व सभासदांकरिता नोटीस

ज्या अर्थी कॉसमॉस को–ऑप. बँक लि., ची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक २०२४–२५ ते २०२९–३०, बहुराज्यीय सहकारी संस्थांचा कायदा २००२, त्याखालील नियम, बँकेचे पोटनियम यास अनुसरून विशेष सर्वसाधारण सभा रविवार, दि. १५/१२/२०२४ रोजी घ्यावयाचे ठरले आहे. त्यानुसार दि. ३१/१०/२०२४ रोजीची कॉसमॉस को–ऑप. बँक लि., यांच्या सभासदांच्या खाली नमूद केल्याप्रमाणे दोन प्रकारच्या याद्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात व बँकेच्या सर्व शाखांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

१) मतदानासाठी पात्र सभासदांची यादी
२) अपात्र सभासदांची यादी:–
 अ) थकबाकी असलेल्या सभासदांची यादी.
 ब) 'ॲक्टीव्ह' नसलेल्या सभासदांची यादी.
 क) बँकेच्या आजी/माजी सेवक सभासदांची यादी.

बँकेच्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, उपरोक्त नमूद क्र. १ व २ (अ, ब आणि क) मधील आपापली माहिती सभासदाने पहावी. वैयक्तिक माहिती संदर्भात किंवा सभासद यादीतील नाव व अन्य तपशीलासंबंधी काही तक्रार वा आक्षेप वा हरकती असल्यास त्या दि. २३/११/२०२४ ते दि. २६/११/२०२४ पर्यंत स. ११.०० ते दु. ३.०० या वेळेतच निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे, त्यांचे उपरोक्त नमूद कार्यालयात लेखी स्वरूपात पुराव्यासह समक्ष अथवा वर नमुद ईमेल द्वारे द्याव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकती वा आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

## संचालक मंडळ निवडणूक सन २०२४–२५ ते २०२९–३०

१. निवडून द्यावयाच्या संचालकांची संख्या–१३ (सर्वसाधारण–१०, अनुसूचीत जाती/जमाती–०१ व महिला–०२)
२. बँकेचे कार्यक्षेत्र – ०७ राज्य (महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, कर्नाटक आणि मध्यप्रदेश)

| संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | बाब | दिनांक व वेळ | ठिकाण |
| १. | मतदानासाठी पात्र सदस्य/प्रतिनिधींच्या प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि. २२/११/२०२४ (शुक्रवार), सकाळी ११.०० वा. | बँकेचे मुख्यालय आणि सर्व बँक शाखा |
| २. | प्रारुप मतदार यादीवर हरकत/आक्षेप सादर करण्याचा कालावधी व वेळ | दि. २३/११/२०२४ ते २६/११/२०२४ (शनिवार ते मंगळवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत, दररोज | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ३. | प्रारुप मतदार यादीवर प्राप्त हरकत / आक्षेपांची छाननी करणे. | दि. २७/११/२०२४ ते दि. ३०/११/२०२४ (बुधवार ते शनिवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत, दररोज | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ४. | मतदानासाठी पात्र सदस्य / प्रतिनिधी यांची अंतीम मतदार यादी प्रसिध्द करणे. | दि. ०२/१२/२०२४ (सोमवार), सकाळी ११.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय / बँकेचे मुख्यालय आणि सर्व बँक शाखा. |
| ५. | नामनिर्देशन पत्र विक्री आणि स्विकृत कालावधी | दि. ०३/१२/२०२४ ते दि. ०६/१२/२०२४ (मंगळवार ते शुक्रवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत, दररोज | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ६. | निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रांची यादी संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिध्द करणे. | दि. ०६/१२/२०२४ (शुक्रवार), सायंकाळी ०५.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ७. | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे. | दि. ०७/१२/२०२०४ (शनिवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ८. | वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करणे. | दि. ०७/१२/२०२४ (शनिवार), सायंकाळी ०५.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ९. | नामनिर्देशन पत्र माघारी घेणेचा कालावधी व वेळ. | दि. ०८/१२/२०२४ ते दि. ०९/१२/२०२४ (रविवार ते सोमवार), सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| १०. | निवडणुकीस पात्र उमेदवारांची अंतीम यादी प्रसिध्द करणे. | दि. ०९/१२/२०२४ (सोमवार), सायंकाळी ०५.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय |
| ११. | आवश्यक असल्यास मतदानाची तारीख व वेळ. | दि. १५/१२/२०२४ (रविवार), सकाळी ०८.०० ते सांय. ०४.०० पर्यंत आणि ज्यांनी दुपारी ०४.०० वाजता किंवा त्यापूर्वी मतदान केंद्रात प्रवेश केला असेल त्यांना मतदान करण्याची परवानगी राहील. | मतदान केंद्राचे नाव व ठिकाण स्वतंत्रपणे घोषित केले जाईल. |
| १२. | मतमोजणीची तारीख व वेळ. | दि. १९/१२/२०२४ (गुरुवार), सकाळी ०८.०० पासून पुढे | मतमोजणीचे ठिकाण स्वतंत्रपणे घोषित केले जाईल. |
| १३. | निवडणुकीचा निकाल घोषित करणे. | दि. २३/१२/२०२४ (सोमवार), सहकारी निवडणूक प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मान्यतेनंतर नमूना 19M मध्ये. | बँकेचे मुख्यालय |
| पदाधिकारी निवडीचा निवडणूक कार्यक्रम | | | |
| १. | निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करणे<br>अ. नामनिर्देशन पत्र सादर करणे<br>ब. नामनिर्देशन पत्र माघारी घेणे<br>क. प्राप्त नामनिर्देशन अर्जांची यादी प्रसिध्द करणे | दि. २४/१२/२०२४(मंगळवार), संचालक मंडळ सदस्य निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर | बँकेचे मुख्यालय |
| २. | नव्याने स्थापन केलेल्या संचालक मंडळाची बैठक आणि वैध नामांकन, मतदान (आवश्यक असल्यास) यादी प्रसिध्दी करणे. | दि. २६/१२/२०२४ (गुरुवार), सकाळी ११.०० पासुन पुढे | बँकेचे मुख्यालय |
| ३. | पदाधिकारी निवडीचा निकाल जाहीर करणे | सहकारी निवडणूक प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मान्यतेनंतर नमुना 19N मध्ये | बँकेचे मुख्यालय |

**(संजय राऊत)**
**सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी**
**कॉसमॉस को–ऑप. बँक लि. पुणे**
**तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर**

**(डॉ. सुहास दिवसे (भा.प्र.से))**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**कॉसमॉस को–ऑप. बँक लि. पुणे**
**तथा**
**जिल्हाधिकारी, पुणे**

ठिकाण : पुणे
दिनांक : २२/११/२०२४